**प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान या योजनेंअंतर्गत निधी वितरित करण्याबाबत.......**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०२३/प्र.क्र.१०५/कौशल्य-१**
२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३ नोव्हेंबर,२०२३.

**वाचा :**

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५.
२) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/प्र.क्र.१९५/ रोस्वरो-१, दिनांक ०३/०८/२०१५.
३) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/ प्र.क्र.१२२/ रोस्वरो- १, दिनांक ०२/०९/२०१५
४) वित्त विभाग,शासन परिपत्रक,क्र. अर्थसं.-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३/दिनांक १२ एप्रिल, २०२३.
५) कौ.रो.उ. व ना.वि.शक्ती प्रदत्त समिती बैठक दिनांक १५ एप्रिल, २०२३ इत्तिवृत्त दिनांक २२ एप्रिल,२०२३.
६) महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांचे पत्र क्रमांक MSSDS/ PMKUVA/२०२३२-४/६३६, दिनांक २२/०६/२०२३.
७) कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग,शासन निर्णय, क्रमांक: कौविउ-२०२३/प्र.क्र.१०५/कौशल्य-१/दिनांक: २७ जुलै, २०२३.
८) महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांचे पत्र क्रमांक MSSDS/ PMKUVA/२०२३२-४/१३७० दिनांक २३/१०/२०२३.

**प्रस्तावना :-**

प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात रु. २३४.९० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला असून सदर निधीपैकी रु. ४६.०० कोटी इतका निधी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीला सं.क्र.७ येथील शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आला आहे. सं.क्र.८ येथील पत्रान्वये कौशल्य विकास सोसायटीने माहे ऑक्टोंबर, २०२३ पर्यंत अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेला निधी वितरीत करण्याची विनंती शासनास केली असून सदर निधी वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर सन २०२३-२४ मध्ये रु.२३४.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित असून सदर अर्थसंकल्पित शिल्लक रु.१८८ इतक्या निधीमधून रु. ७१.०० कोटी (अक्षरी रुपये एकाहत्तर कोटी फक्त) इतका निधी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीला वितरीत व खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्य शासनाने या योजनेसाठी वितरीत केलेला निधी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांनी कोषागारामधून आहरीत करून मुख्य कार्यकारी अधिकारी, महराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांना खर्चासाठी उपलब्ध करून देण्यात यावा. याकरीता आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांना “नियंत्रक अधिकारी” तसेच सहायक संचालक (लेखा) कोकण भवन यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर निधी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय यांनी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांना तात्काळ उपलब्ध करुन देऊन या संदर्भातील लेखे अद्ययावत ठेवावेत.

४. उपरोक्त निधी ज्या कारणास्तव उपलब्ध करुन देण्यात आला आहे त्याच कारणास्तव खर्च करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांची राहील. तसेच प्रत्यक्ष खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) विहित कालमर्यादेत सादर करण्याची दक्षता आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय यांनी घ्यावी.

५. या कार्यक्रमाकरिता होणारा खर्च मागणी क्रमांक झेडए-२, २२३० कामगार व सेवायोजन, (०१) (०८) प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता अभियान (कार्यक्रम) लेखाशिर्ष (२२३० ६११८), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२४ मध्ये अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

६. सदरहू शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८,दिनांक १७ एप्रिल, २०१५ प्रशासनिक विभागास दिलेल्या अधिकारांस अनुसरुन तसेच वित्त विभाग परिपत्रक १२एप्रिल, २०२३ मधील तरतुदींस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. सदर निधी खर्च करताना वित्त, नियोजन, तसेच उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, परिपत्रक, शासन निर्णयांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२३११०३१५२७४६८४०३ असा आहे. हा आदेश डिजीटल साक्षांकीत करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MITHUN MOHANRAO SALUNKHE

Digitally signed by MITHUN MOHANRAO SALUNKHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILLS EMPLOYMENT ENTERPREUNERSHIP AND INNOVATION DEPARTMENT, 2.5.4.20=eb410b645758d07ea6303743e3a96f12f7b5ea5c78305aa3546f1b05a4d188d9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=928224E8C07F06F0A63241EEC16360F9961117B3DFDA771ED6746D1433B5EA7A, cn=MITHUN MOHANRAO SALUNKHE
Date: 2023.11.03 15:27:26 +05'30'

**( मिथुन साळुंखे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा, मा.सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन,मुंबई
४. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई

६. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
७. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
८. अ.मु.स. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई.
९. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, कोकण भवन, मुंबई.
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
११. सहायक संचालक (लेखा), कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, मुंबई.
१२. कोषागार कार्यालय, मुंबई/नवी मुंबई.
१३. महालेखापाल (लेखा परीक्षा /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे.
१५. अपर कोषागार अधिकारी, उप कोषागार कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई,
१६. कक्ष अधिकारी , प्रशा-३, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. निवड नस्ती (कौशल्य-१ ), कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.